Saamna, Pune, (Marathi) 5 July 2013

GLOBAL EDITION
सामना
सर्वांसाठी सर्वकाही
मराठी माणसाचे स्वतःचे वृत्तपत्र.

Print Email Comment

# हरित नियमांची प्रभावी अंमलबजावणी हवी

पुणे, दि. ४ (प्रतिनिधी) - हिंदुस्थान हा पवनऊर्जेच्या वापराबाबत अघाडीवर असूनही पवनऊर्जेच्या वापरामुळे होणाऱ्या पर्यावरणीय परिणामांकडे दुर्लक्ष करत आहे. पवनऊर्जेच्या शाश्वत वाढीसाठी हिंदुस्थानने कडक पर्यावरणीय हरित नियमांची अंमलबजावणी करायला हवी, असे मत 'पवनऊर्जेसाठी हरित नियम' या एकदिवसीय चर्चासत्रात पर्यावरण तज्ज्ञांनी मांडले.

दिल्ली येथील सेंटर फॉर सायन्स ॲण्ड एन्व्हायरमेंट (सीएसई) या संस्थेने 'पवनऊर्जेसाठी हरित नियम' या एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. सीएसईचे चंद्र भूषण, सुझलॉन एनर्जीचे चिंतन शहा, क्रिएटिव्ह नेचर फ्रेंडचे नाना खामकर आदी चर्चासत्रात सहभागी झाले होते.

सीएसईचे उपसंचालक चंद्र भूषण म्हणाले,

## चर्चासत्रात मान्यवरांचे मत

पवनऊर्जा प्रकल्पांसाठी वनजमिनीची मागणी उद्योजकांकडून सातत्याने वाढत असल्याचे सीएसईच्या अभ्यासामध्ये आढळून आले आहे. कोणत्याही पर्यावरणीय अहवालाचा अभ्यास न करता उद्योजक अभयारण्यांमध्येही पवनऊर्जेचे प्रकल्प उभारत आहेत. मात्र, पवनऊर्जा प्रकल्पांमुळे पर्यावरणावर नेमके काय परिणाम होत आहेत, याचा विचार कोणीही करताना दिसत नाही, असे ते म्हणाले.

पवनऊर्जा प्रकल्पांच्या ठिकाणी पवनऊर्जा आराखडा तयार करावा, नागरिकांवर होणाऱ्या संभाव्य आरोग्यविषयक परिणामांबाबत निकष निश्चित करावेत, या प्रकल्पांमधून तयार होणाऱ्या विजेवर सर्वप्रथम तेथील लोकांचा अधिकार असावा, जमिनीच्या वापराबाबत निकष निश्चित करावेत, अशा शिफारसी सीएसईने चर्चासत्रात सुचविल्या आहेत.